ई महा भूमि

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे
दूरध्वनीक्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@gov.in Web site: https://mahabhumi.gov.in

क्र.रा.भू.४/महसुल वर्ष/मागणी निश्चिती/२०२३ दिनांक: २५/०७/२०२३

प्रति,

विभागीय आयुक्त, सर्व.

विषय- ई-चावडी भाग १ आकारणी विषयक अद्ययावतीकरण या कामकाजामध्ये महसुल वर्ष बदलानुसार करावयाच्या कार्यवाही बाबत.

महोदय,

राज्यामध्ये ई-चावडी प्रणाली लागू करण्यात आली आहे, ई-चावडी प्रणालीतील पहिल्या भागामध्ये तलाठी दफ्तरांचे आकारणी विषयक अद्ययावतीकरण करुन प्रत्येक गावातील महसुल मागणी निश्चिती व त्यानुसार महसुलाची वसुली या प्रक्रीया ऑनलाईन करण्याची कार्यवाही या प्रणालीद्वारे सर्व गावांमध्ये सुरू आहे. दि. २५ जुलै २०२३ रोजी राज्यातील ४४,५२५ गावांपैकी ३०,००५ (६७.३८%) गावांनी ही कार्यवाही पुर्ण केल्याचे दिसते व उर्वरीत गावांची कार्यवाही अद्याप चालू आहे. तथापि, दि. ३१ जुलै २०२३ रोजी महसुली वर्षाअखेर येत असल्या कारणाने उर्वरित गावांसाठी आता ही कार्यवाही आगामी महसुली वर्षासाठी करावी लागेल. मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या निर्देशानूसार महाराष्ट्रातील सर्व महसुली गावांसाठी दि. १ ऑगस्ट २०२३ ची मागणी निश्चितीची प्रक्रीया आहे १००% ऑनलाईन करणे आवश्यक आहे.

यासाठी आजरोजी ज्या गावांनी दि.१ ऑगस्ट २०२२ रोजीची खातेदार मागणी निश्चिती प्रक्रीया अर्धवट पूर्ण केली असेल ती पूर्ण करुन घ्यावी. जेणेकरुन दि.१ ऑगस्ट २०२३ रोजीची मागणी योग्यरीत्या निश्चित करता येईल. तसेच ज्या गावांचे online वसुलीसाठीचे data entry कामकाज अद्याप सुरु झालेले नाही, त्या गावांनी दि. १ ऑगस्ट २०२३ रोजीचा खातेदारांच्या डेटानुसार ई-चावडी मध्ये data entry करण्यासाठी दफ्तर अद्ययावतीकरणाची प्रक्रीया सुरु करावी. दि. १ ऑगस्ट २०२३ रोजीची खातेदारांची माहिती संगणकीकृत माध्यमातून Freeze करुन दि. १० ऑगस्ट २०२३ पावेतो सर्व गावांना ई-चावडी प्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी दि. १ ऑगस्ट २०२३ ते दि. १० ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये ई-चावडी प्रणालीमध्ये ८ब, ८क व ८ब+८क या तक्त्यांमध्ये कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. दि. १० ऑगस्ट २०२३ पासून २०२२-२३ या महसुली वर्षामध्ये झालेले कामकाज हे ई-

चावडी प्रणालीमध्ये केवळ बघता (view olny) येईल. परंतु त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही जसे की, मागणी निश्चिती, मागणी निश्चिती नुसार चलन काढणे, चलन भरणा व चलन अपलोड या गोष्टी उपलब्ध असणार नाही. ज्या तलाठ्यांनी त्यांचे मागणी निश्चितीचे कामकाज पूर्ण केलेले आहे त्यांनी त्याच्या पावत्या व चलन भरणा हा तात्काळ करुन घ्यावा. जेणेकरुन त्यांच्या गावाचा ८ड हा ऑनलाईन तयार होईल व ही माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध राहील.

उपरोक्त पत्रातील सुचनांनुसार सर्व जिल्हाधिकारी यांना कृपया आपले स्तरावरुन योग्य ते आदेश द्यावेत. तसेच सर्व तलाठी यांनी दि. १० ऑगस्ट २०२३ पासून दि. १ ऑगस्ट २०२३ रोजीच्या खातेदार स्थितीप्रमाणे सन २०२३-२४ ची वसूली करण्याची मागणी निश्चिती करावयाची कार्यवाही सुरु करावयाची आहे. याबाबत वरीलप्रमाणे सविस्तर सुचना आपले स्तरावरुन निर्गमित कराव्यात.

(नि.कु.सुधांशु)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे.